प्रभात

# 'रिॲलिटी चेक' उपक्रमातून सायबर सुरक्षेचा जागर

## डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचा उपक्रम



**पिंपरी, दि. २० (प्रतिनिधी) -** डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपरी येथील क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमांतर्गत कार्यरत क्विक हील सायबर वॉरियर्स क्लबतर्फे 'रिॲलिटी चेक' या मासिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्लबच्या अध्यक्षा नेहा मडिवालकर यांनी क्लबची उद्दिष्टे आणि सायबर जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.निविदा काळे व आकाश वाघवाड यांनी बनावट ऑनलाईन अभ्यासक्रम आणि खोट्या प्रमाणपत्रांच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सेक्सटॉर्शन आणि डिजिटल अरेस्ट या सायबर गुन्ह्यांवरील माहितीपट दाखविण्यात आले होते. क्लबचे जनसंपर्क व प्रसारमाध्यम संचालक सार्थक पानसरे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित डीपफेकचे प्रात्यक्षिक सादर करून तंत्रज्ञानाचा गैरवापर कसा होतो, हे त्यांनी स्पष्ट केले. तसेच विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा अतिरेक आणि ऑनलाइन गेमिंग-जुगाराच्या दुष्परिणामांवर प्रभावी मूकनाट्य सादर करण्यात आले. 'भूतम भयम' या आगामी मराठी चित्रपटाचे कलाकार उपस्थिती होते. छाया कदम, करण सोनावणे, नील साळेकर, प्रियदर्शन जाधव यांच्यासह इतर कलाकारांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, सचिव डॉ. सोमनाथ पाटील, प्राचार्य डॉ. रणजित पाटील, उपप्राचार्य डॉ. जयवंत बाबर, प्रा. सत्यवान कुंजीर, क्विक हील फाउंडेशनचे अजय शिर्के, संत तुकाराम नगर पोलीस ठाण्याचे शशिकांत गाडेकर, सायबर सेलचे प्रवीण स्वामी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी सायबर सुरक्षा शपथ घेतली.